# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 (1) अन्वये आदेश

4928 जा.क्र.बँक/येवला मर्चंट बँक/क.83/आदेश/सन 2017
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचे
कार्यालय, नॅशनल उर्दु हायस्कुलजवळ,
सारडा सर्कल, नाशिक, ता. जि. नाशिक.
दिनांक :-20/09/2017

**वाचावे :-**
1. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 (1)
2. श्री.बंडू अंबादास क्षिरसागर व इतर 4 यांचा दिनांक 19/04/2017 रोजीचा तक्रार अर्ज
3. या कार्यालयाकडील पत्र जा.क्रं.बँक/तक्रार/सन2017 दि.19/04/2017 रोजीचे पत्र
4. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदगांव यांचेकडील जा.क्र. 269/वि-1/ येवला म.को.त.अ./2017, दिनांक 05/05/2017 रोजीचा चौकशी अहवाल
5. या कार्यालयाकडील पत्र जा.क्रं.बँक/येवलामर्चंट/बंअंक्षीरसागर/17, दिनांक 19/05/2017 रोजीचे पत्र
6. चेअरमन व इतर संचालक / मुख्य कार्यकारी अधिकारी, दि. येवला मर्चन्ट को-ऑप. बँक लि. येवला, ता. येवला, जि. नाशिक यांचा दिनांक 09/06/2017 रोजीचा लेखी खुलासा
7. श्री. बंडू अंबादास क्षिरसागर व इतर 4 यांचा दिनांक 09/06/2017 व दिनांक 14/06/2017 रोजीचा अर्जदार यांचा लेखी खुलासा

ज्याअर्थी, दि. येवला मर्चन्ट को-ऑप. बँक लि. येवला, ता. येवला, जि. नाशिक (यापुढे जिचा उल्लेख बँक असा केला आहे) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 व नियम,1961 अन्वये नोंदविण्यात आलेली बँक आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियम 1961 मधील तरतुदी, उक्त बँकेचे मंजुर उपविधीतील तरतुदी शासनाकडील शासन निर्णय, परिपत्रके व मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाकडील परिपत्रके व सूचनांनुसार सदर संस्थेचे कामकाज करणे संस्थेच्या संचालक मंडळ व अधिकारी / कर्मचारी वर्गावर बंधनकारक आहे.आणि,

ज्याअर्थी, दि. येवला मर्चन्ट को-ऑप. बँक लि. येवला, ता. येवला, जि. नाशिक या संस्थेबाबत वाचावे क्रं.2 अन्वये श्री. बंडू अंबादास क्षिरसागर व इतर 4 यांचा दिनांक 19/04/2017 रोजीचा तक्रार अर्जावर प्राप्त झालेला आहे. त्यानुसार या कार्यालयाकडुन वाचावे क्रं.3 अन्वये सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, नांदगांव यांना चौकशी करिता प्राधिकृत करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने, वाचावे क्रं. 4 अन्वये, प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाल सादर केलेला असून, सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने तक्रारदार व उक्त बँकेच्या चेअरमन व इतर संचालक / मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वाचावे क्रं. 5 अन्वये खुलासा सादर बाबत कळविण्यात आलेले आहे. वाचावे क्रं. 6 अन्वये, चेअरमन व इतर संचालक / मुख्य कार्यकारी अधिकारी, दि. येवला मर्चन्ट को-ऑप. बँक लि. येवला, ता. येवला, जि. नाशिक यांनी दि.09/06/2017 रोजी लेखी खुलासा सादर करण्यात आलेला आहे. वाचावे क्रं. 7 अन्वये, श्री. बंडू अंबादास क्षिरसागर व इतर 4 यांनी दिनांक 09/06/2017 व दिनांक 14/06/2017 रोजी लेखी खुलासा सादर करण्यात आलेला आहे.

Scanned by CamScanner

ज्याअर्थी, दि. येवला मर्चंन्ट को-ऑप. बँक लि. येवला, ता. येवला, जि. नाशिक या संस्थेबाबत वाचावे क्रं.2 अन्वये श्री.बंडू अंबादास क्षिरसागर व इतर 4 यांचा दिनांक 19/04/2017 रोजीचा तक्रार अर्ज व सादर केलेला खुलासा व त्यानुषंगाने प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी दिनांक 05/05/2017 रोजीचा चौकशी अहवाल सादर केलेला असून सदर चौकशी अहवालानुसार बँकेसाठी धोरणात्मक निर्णय घेतांना विहीत पध्दतीने कामकाज करणे गरजेचे असुन वस्तुंची खरेदी करतांना निविदा न घेता खरेदी करणे व बँकेत सन 2016 -17 मध्ये व्यक्तींच्या नियमबाह्यपणे केलेल्या नोकर भरती प्रकिया राबवितांना बँकेच्या सेवानियमांचे व सहकार कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे. सन 2013-14 चा लेखापरिक्षण अहवाल व सन 2014-15 चा लेखापरिक्षणा अहवालामधील मुद्दांनुसार आणि वाचावे क्रं. 2 व 4 मधील गंभीर बाबी बाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1960 चे कलम 83 (1) अन्वये प्राधिकृत अधिका-यांमार्फत सखोल चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**-: आदेश :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 83 (1) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, निलकंठ करे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक, दि. येवला मर्चंन्ट को-ऑप. बँक लि. येवला, ता. येवला, जि. नाशिक या बँकेची आर्थिक स्थिती व कामकाजाची सोबत जोडलेल्या परिशिष्ट - अ मध्ये नमुद केलेल्या मुद्यांवर चौकशी करण्यात यावी.

सदर चौकशी करण्यासाठी श्री. गुजराथी ..........................यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करीत आहे. प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 व त्याखालील नियमांस अधिन राहून परिशिष्ट - अ मधील मुद्दयांवर चौकशी करुन कायद्याने विहीत केलेल्या कालावधीमध्ये चौकशीचे कामकाज पूर्ण करावे व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

ठिकाण :- नाशिक
दिनांक :-20 /09/2017

(निलकंठ करे)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक

**प्रति :-**

1) श्री. अजय गुजराथी ..........................

2/- त्यांना कळविण्यांत येते की, प्रस्तुत आदेशासोबत मुळ आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुसार आपण चौकशीचे कामकाज तात्काळ सुरु करुन मुदतीत अहवाल सादर करावा.

2) चेअरमन/मुख्य कार्यकारी अधिकारी, दि. येवला मर्चंन्ट को-ऑप. बँक लि. येवला, ता.येवला, जि. नाशिक

2/- त्यांना सुचना देण्यात येते की, चौकशीकामी प्राधिकृत अधिका-यास वेळोवेळी सर्व आवश्यक ते कागदपत्रे व दप्तर उपलब्ध करुन माहिती पुरवावी.

3) संवका शाखा,अधिन जिल्हा उपनिबंध,सहकारी संस्था, नाशिक

**प्रत माहितीस्तव सविनय सादर**

मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक

जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक

Scanned by CamScanner

दि. येवला मर्चंन्ट को-ऑप.बँक लि. येवला, ता. येवला , जि. नाशिक या बँकेच्या
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,1960 चे कलम 83 (1) अन्वयेच्या चौकशी आदेशासोबतचे

## परिशिष्ट "अ"

1) बँकेसाठी बऱ्याच वस्तुंची खरेदी करतांना वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द न करता मोठ्या रकमांची खरेदी करतात. बँकेने सॉफ्टवेअरला इंटर बँच कनेक्टीव्हीटीसाठी टॉवर व इतर साहित्याची खरेदी करणे.

2) बँकेत सन 2016-17 मध्ये नोकर भरती प्रकिया राबविण्यात आलेली असुन सदरची नोकर भरती प्रकिया राबवितांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मा. सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कडील मार्गदर्शक तत्वे व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 मधील तरतुदी तसेच बँकेच्या सेवानियमातील तरतुदीचे उल्लंघन झालेले आहे किंवा काय ?

3) सन 2013 - 14 चा लेखापरिक्षण अहवालाबाबत

अ) संचालक मंडळाची प्रत्येक महिन्यात किमान एक तरी सभा पोटनियमानुसार होणे गरजेचे आहे मात्र बँकेच्या संपुर्ण वर्षभरात फक्त 9 सभा झालेल्या आहे.याचा अर्थ 3 सभा कमी बोलावून पोटनियमाचे उल्लंघन झालेले आहे.

ब) बँकेचे सन 2013-14 या आर्थिक वर्षात सन 2012-13 या आर्थिक वर्षाच्या तुलनेने एकुण उत्पन्न रुपये 1,53,61,280/- एवढे वाढलेले आहे मात्र त्या तुलनेने नफा हा फक्त रुपये 1,71,405/- एवढाच वाढला आहे.

क) ताळेबंदात रिझर्व्ह आणि जनरल रिझर्व्ह फंडाची रुपये 548.34/- लाखाची तरतुद केलेली असून सदर रक्कम संपुर्णपणे गुंतवणूक करणे गरजेचे असतांना फक्त रुपये 502.09/- लाख इतकीच रक्कम गुंतवलेली आहे.

4) सन 2014-15 चा लेखापरिक्षण अहवाल

अ) बँकेच्या मोठ्या प्रमाणावर इमारत, फर्निचर इ. भांडवली खर्च करण्यात आलेला असून कुठल्याही प्रकारची कमिटी स्थापन न करता तसेच टेंडर न मागविता, किंमतीबाबत तुलनात्मक माहिती न घेता खर्च करण्यात आलेला आहे.

ब) बँकेने कर्जदाराच्या खात्यावर दंड व्याज आकारणे कायदेशीर दृष्टया गरजेचे असतांना कुठल्याही प्रकारचे दंडात्मक व्याज आकारलेले नाही. ज्यामुळे बँकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

क) सोनेतारण कर्जवाटप करतांना बँकेच्या नियमाप्रमाणे 10.00 ग्रॅम सोन्यावर रुपये 15,000/- या प्रमाणे कर्ज द्यावायास हवे होते. प्रत्यक्षात मात्र यापेक्षा जास्त रकमेचे कर्जवाटप करुन नियमांचे उल्लंघन झालेले आहे.

ड) आर्कीटेक्टने दिलेल्या कोटेशन प्रमाणे एक्स्टेरीअर इलेवेशनचा खर्च हा रुपये 10,35,838/- इतकाच होता. मात्र प्रत्यक्षात याच्या दुप्पट खर्च झालेला दिसून येतो.

ठिकाण :- नाशिक
दिनांक :- 20/09/2017

(निलकंठ करे)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक

DISTT. DEPUTY REGISTRAR CO-OPERATIVE SOCIETIES NASIK

Scanned by CamScanner